'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# तेदेपाची तेलंगणा बाबत दुटप्पी भूमिका

प्रा. माधव चोले
(सहाय्यक प्राध्यापक) राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय, देगलूर
मो.नं.९९७०५६३३८५
Email - cholemadhave@gmail.com

भाषावार प्रांतरचनेनंतर तब्बल ३० वर्षानंतर १९८३ साली प्रादेशिक आस्मितेचे राजकारण आणि काँग्रेस विरोधी मुद्दे घेवून राज्यस्तरावरील राजकारणात राजकिय बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने चित्रपट अभिनेते एन.टी. रामाराव यांनी 'तेलगु देशम' पक्षाची स्थापणा केली. १९८३ मध्ये राज्यविधानसभा निवडणुक झाली. पक्ष स्थापण करुन सहा महिने झाले असतांनाच नाटयमयरित्या या पक्षाला २०३ जागा (४७ टक्के मते) मिळाल्या तर १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत ३० जागा (४४.८ टक्के मते) मिळाल्या होत्या. १९८५ च्या राज्यविधानसभा निवडणूकीत पुन्हा २०२ जागा जिंकल्या मताची टक्केवारी (४६.२१ टक्के) होती.[१] या पक्षाचा सामाजिक आधार कम्मा आणि रेड्डी व उच्च जाती राहिल्या आहेत.

१९८९ च्या लोकसभा निवडणुकीत या पक्षाला फक्त २ जागा (३४.५ टक्के मते) तर त्याच वर्षीच्या राज्यविधान सभा निवडणूकीत तेलगु देसमला ७४ जागा (३६.६४ टक्के मते) मिळाल्या होत्या या निवडणूकीत तेलगु देशमचा पराभव झाला होता. १९९४ च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसला २९४ पैकी फक्त २६ जागा (मताची टक्केवारी ३३.८५ ) मिळाल्या तर तेलगु देशमला २१६ जागा (४४.१४ टक्के मत) मिळाल्या आणि तेलगु देशम सत्तेत आली १९९५ मध्ये एन.टी.आर. चे जावाई आणि पक्षाचे महत्वाचे नेते चंद्राबाबु नायडु यांनी बंडखोरी करुन एन.टी.आर यांना सत्तेवरुन दुर केले आणि स्वतः कडे पक्षाची व सरकारची सर्व सुत्रे हाती घेतली १९९६ मध्ये एन.टी.आर चे निधन झाले.[२]

१९८३-८९ व १९९४ - ९६ पर्यंतच्या काळात तेलगु देसम पक्षाचे वर्चस्व आंध्राच्या राजकारणात वाढले त्यात एन.टी रामराव आणि चंद्राबाबु नायडु यांनी तेलंगणा विकासाला थोडा फार हातभार लावला. हैद्राबादमध्ये उद्दयोग, माहिती तंत्रज्ञान तसेच मोठी आर्थिक गुंतवणूक केली आणि विकासाला चालना दिले त्यामुळे या काळात तेलंगणाचा मुद्दा प्रभावीपणे पुढे आला नाही.[३]

**१९९९ च्या निवडणुका :- (TDP आणि BJP युती )**

भाजपाने १९९७ मध्ये स्वतंत्र तेलंगणा राज्य निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर स्वतंत्र तेलंगणा देण्याचे आश्वासन दोन्ही पक्षाकडून देण्यात आले. १९९९ च्या लोकसभा राज्यविधानसभा निवडणूका TDP आणि BJP ने युती करुन लढवल्या या निवडणूकीत लोकसभेत तेलगु देशमला २९ जागा (३९.९ टक्के मते) तर भाजपाला ७ जागा (९.९ टक्के मते) मिळाल्या केंद्रात रालोआ सरकार आले. चंद्राबाबु रालोआ सरकारमध्ये सहभागी झाले. या निवडणुकीत विधानसभेत तेलगु देसमला १८० जागा (४३.८७ टक्के मते) तर भाजपाला १२ जागा (३.६७ टक्के मते) मिळाल्या . राज्यात तेलगु देशमची सत्ता आली. तेलगु देसम आणि भाजपाला अनुक्रमे कम्मा, रेड्डी आणि उच्च जातीचे प्रतिनिधीत्व करत असल्याने या सामाजिक जातीगटाचा पाठिंबा मोठ्या प्रमाणात त्यांना असल्याचे उघड झाले. तसेच या आघाडीला इतर मागासवर्गीय समाज आणि अनुसूचित जमाती या सामाजिक गटांचा पाठिंबाही मिळविलेला होता.

नोव्हेंबर २००१ मध्ये रालोआ सरकारने उत्तराखंड, छत्तीसगड व झारखंड या तीन नवीन राज्यांची निर्मिती केली. पण तेलंगणाची निर्मिती केलेली नाही. कारण त्यावेळी रालोआ मध्ये तेदपा होती आणि तेदेपाने स्वतंत्र तेलंगणा राज्य निर्माण करण्याला विरोध केलेला होता. २००१-२००२ मध्ये काँग्रेस कार्यकारणीने तत्कालीन रालोआ सरकारकडे वेगळ्या तेलंगणा राज्यांचा ठराव पाठविला होता पण रालोआतील तेदेपाचा विरोध लक्षात घेवून केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण आडवाणी यांनी अशी छोटी राज्य देशाच्या हितासाठी योग्य नसल्याचे सांगून तो फेटाळला २०१२ मध्ये तेच आडवाणी म्हणाले तेंव्हा NDA काळातील भागीदार TDP ने जर सहकार्य केले असते तर पृथक तेलंगणा राज्य निर्माण झाले असते. [४]

**२००४ च्या निवडणूका आणि तेदेपा :-**

२००४ च्या विधानसभा निवडणूकीत स्वतंत्र तेलंगणा देण्याच्या अटीवर तेलंगणा राष्ट्रसमिती आणि काँग्रेसमध्ये युती झालेली होती पण या निवडणूकीत तेलगु देशमला ४७ जागा आणि मतदानाची टक्केवारी (३७.६ टक्के) होती. तर भाजपाला फक्त दोन जागा (२.६ टक्के मते) मिळाल्या होत्या. तर लोकसभा निवडणूकीत तेदेपाला फक्त ५ जागा (३३.१ टक्के) मते मिळाली होती. तर भाजपाला एकही जागा मिळाली नाही (८.४ टक्के) अर्थात युतीचा दारुण पराभव झाला कारण त्यांनी या अगोदर निवडणूकीत दिलेले आश्वासन पाळलेले नव्हते. उलट पक्षी काँग्रेसने आश्वासन दिले. दुसरा मुद्दा म्हणजे स्वतंत्र तेलंगणासाठी आंदोलन करणारा पक्ष काँग्रेस सोबत गेला. या निवडणूकीत तेलगु देशम आणि भाजपाचा सामाजिक आधार असलेल्या उच्च जाती, कम्मा, रेड्डी आणि ओ.बी.सी चे प्रमाण कमी होवून काँग्रेसच्या पारड्यात गेली.[५]

**२००९ च्या निवडणूका आणि तेदेपा :-**

जुलै २००८ मध्ये देवेंदर गौड आणि इ.पेद्दी, रेड्डी यांनी तेलगु देशम पार्टीचा (TDP) चा राजीनामा देवून नवीन पक्ष 'नव तेलंगणा प्रजा पार्टी' (NTPP) ची स्थापना तेलंगणा निर्मितीच्या मुख्य भुमिकेसह केली . विरोधी पक्ष TDP ने अंतर्गत सखोल चर्चा करुन तेलंगणा निर्मितीच्या बाजूने आपले ९ आक्टोंबर २००८ रोजी समर्थन जाहिर केले तेलगु देशम पक्षाने तेलंगणा निर्मितीच्या दृष्टीने कार्य करण्याचे वचन दिले. २००९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत तेदेपाने परत स्वतंत्र तेलंगणा राज्याला पाठिंबा दिला. TRS ने २००४ मध्ये स्वतंत्र तेलंगणाच्या मुद्दयावर काँग्रेस सोबत युती केलेली होती. पण काँग्रेसची सत्ता येवून ही त्यांने दिलेले वचन पाळले नाही म्हणून या निवडणूकीत KCR ने स्वतंत्र तेलंगणा मुद्दयाला तेदेपाने पार्ठींबा दिल्याने TRS ने तेदेपा सोबत युती करुन निवडणूका लढविल्या या निवडणूकीत तेदेपाला लोकसभेत ०६ जागा (२४.९ टक्के) मते मिळाली तर विधानसभेत ९२ जागा (२८.१ टक्के) मिळाली या निवडणूकीत राव व नायडु यांच्या आघाडीचा तेलंगणा भागात मोठा पराभव झाला. नायडु यांना राव यांच्या मदतीने डॉ.राजशेखर रेड्डी यांचा पराभव करावयाचा होता. पण त्यांना यश मिळाले नाही. रेड्डी यांच्या काळात राव यांना चळवळ सुरु करता आली नाही.

**तेदपाची दुटप्पी भुमिका :-**

७ डिसेंबर २००९ रोजी तेलंगणा मुद्दा हाताळण्यासाठी आणि रावच्या उपोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेसने सर्वपक्षीय बैढक बोलाविली. या बैढकीत तेदेपाने ही सहभाग घेतला होता. तेदेपाने स्वतंत्र तेलंगणा राज्याला पाठिंबा असल्याचे सांगीतले सर्व पक्षांचा पार्ठीबा असल्याचे गृहीत धरुन पी.चिदंबरमने स्वतंत्र तेलंगणा राज्य निर्माण केले जाईल अशी घोषणा केली. [६] या घोषणेनंतर तेलंगणात जलोष तर सीमांध्रांत 'अखंड आंध्रा' राज्यासाठी आंदोलन तीव्र झाले, अर्थात तेलंगणा समर्थक आणि अखंड आंध्रा समर्थक रत्यावर आले पक्षांचा विचार न करता 'तेलंगणा समर्थक' व 'अखंड आंध्रा' समर्थक आमदार खासदारांनी राजीनामे दिले. सीमांध्रातील लोकांचा विरोध लक्षात घेवून, काँग्रेस

सरकारने २३ डिसेंबर २००९ रोजी सर्वपक्षांचे एकमत होईपर्यंत भारत सरकार तेलंगणावर कोणतीही कार्यवाही करणार नाही असे जाहिर केले. अखंड आंध्राचे आंदोलन व्यापक होत चालले आहे. हे लक्षात घेवून चिरंजीवीच्या 'प्रजा राज्यम' पक्षाने आणि नायडुच्या 'तेलगु देशम' पक्षांने तेलंगणाचे समर्थन मागे घेवून 'अखंड आंध्रा'चे समर्थन केले.

**श्रीकृष्ण समिती अहवालानंतर :-**

६ जानेवारी २०११ रोजी गृहमंत्रालयाने श्रीकृष्ण समितीचे ५०५ पृष्ठे सार्वजनिक केले त्या दिवशी TRS, BJP आणि TDP यांनी हा अहवाल प्रस्तुत प्रश्न सोडविण्या ऐवजी सहा उपायांची चर्चा करतो आणि'एकसंघ आंध्राला' प्राधान्य देतो म्हणून सभात्याग केला. १८ मार्च २०१२ ची पोटनिवडणूक तेलंगणा भागत ६ विधानसभा जांगासाठी झाली. या निवडणूकीत TDP ने तीन मतदारसंघात डिपॉझीट गमावले. अर्थात TDP चा पराभव झाला.[७] १२ जून २०१२ रोजी सीमांध्रात १८ विधानसभा जागासाठी आणि एक संसद सदस्यांसाठी पोटनिवडणूक झाली या निवडणूकीत TDP ने एका मतदारासंघात ३० हजार मते घेवून डिपॉझीट वाचवले. या दोन्ही पोटनिवडणूकीत TDP चा पराभव झालेला आहे. [८,९]

तेलंगणाचे २००९ पासून सतत वाढत, व्यापक होत चाललेले आंदोलन पाहून भारताचे गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी तेलंगणा मुद्दयावर चर्चा करण्यासाठी २८ डिसेंबर २०१२ रोजी सर्वपक्षीय बैढक बोलविली. या बैढकीत TDP ने या अगोदर २००८ मध्ये तेलंगणा निर्मितीचे पत्र आम्ही प्रणव मुखर्जी यांना दिलेले आहोत. ते कधीही आम्ही परत घेणार नाहीत. JAC ने तेलंगु देशम पक्षाला JAC मध्ये सभासदत्वाची परवानगी देतानांच त्यांचे मत अधिक स्पष्ट करण्यास सांगितले होते. कारण या अगोदर तेदेपाने तेलंगणाला पाठींबा दिला. आणि सरकारने घुमजाव केल्यानंतर अखंड आंध्राचे व्यापक आंदोलन लक्षात घेवून तेदेपाने ही आपली भुमिका बदलली होती.

११ मे २०१३ रोजी TDP चे वरिष्ठ नेते पॉलिट ब्युरो सदस्य कडीयाम श्रीहारी यांनी TDP वर नाराज होवून कारण TDP चा तेलंगणा निर्मितीचा संदिग्ध विचार होता म्हणून ते TRS मध्ये सॉमील झाले. [१०]

**विभाजन निर्णयानंतरची TDP ची प्रतिक्रिया :-**

चंद्राबाबू नायडु यांनी २३ ऑगस्ट २०१३ रोजी सांगितले सीमांध्रासाठी नवीन राजधानी बणविण्यासाठी केंद्राने एका तंज्ञ समितीची निर्मिती करावी. नवीन राजधानी हैद्राबादच्या तोला-मोलाची असावी त्यासाठी चार ते पाच लाख कोटी रुपये खर्च येईल. हैद्राबादमध्ये अनेक सार्वजनिक उपक्रम, संशोधन संस्था आणि महत्वाच्या शिक्षण संस्था आहेत. नव्या आंध्रातही अशाच संस्था उभाराव्यात म्हणजे तेथे रोजगारांच्या संधी निर्माण होतील पाणी वाटप, उर्जा, महसुल वाटप, आणि रोजगारांचे समन्यायी वाटप हे प्रश्न ही केद्रांलाच सोडवावे लागतील हे सर्व मुद्दे राज्यपुनर्रचना विधेयकात समाविष्ट करावेत जेने करुन सीमांध्रातील विविध भागातील लोकांच्या मनात अन्याय झाल्याची भावना येणार नाही.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात (२०१३) 'अखंड आंध्रा' राज्यासाठी कॉंग्रेस बरोबरच तेलगु देशमच्या चार खासदारांनी गोंधळ घातला. अखंड आंध्रासाठी घोषणाबाजी केली. त्यामुळे ५ ऑगस्ट २०१३ रोजी दिवसभरासाठी सभाग्रह तहकुब करण्यात आले २३ ऑग्रस्ट २०१३ रोजी सभाग्रहाच्या कामकाजात व्यत्यय आणल्या बद्दल कॉंग्रेसच्या ८ खासदारासह तेलगु देसमच्या चार त्यात निमाला क्रिस्तप्पा, एम वेणुगोपाल रेड्डी, के. नारायणराव, डॉ.निर्मल्ली शिवप्रसाद या बारा खासदारांना उर्वरित अधिवेशन काळासाठी निलंबित करण्यात आले. [११]

सीमांध्रात सुरु असलेल्या 'अखंड आंध्रा' आंदोलनाचा फायदा घेण्यासाठी वाय.एस.आर. कॉंग्रेस आणि तेलगु देशम मध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे.

**सीमांध्रात तेदेपाची वर्चस्वाची लढाई :-**

तेदेपाने तेलंगणा मुद्दयावर, वारंवार कोलांटउड्या घेतलेल्या आहेत यांचे मुख्य कारण म्हणजे भविष्यातील दोन्ही राज्यात राजकिय क्षेत्र असावे म्हणून पण उलटे झाले या दुटप्पी भुमिकेचा चंद्राबाबुला नुकसान होत असल्याचे समोर आले. तेदेपाला दोन्ही पोटनिवडणूकीत आलेले अपयश हे त्यांचे उत्तम उदाहरण होय.

काँग्रेसने येणारी २०१४ ची निवडणूक समोर ठेवून राजकीय सोयीसाठी आंध्रा विभाजनाचे पावले उचलले आहेत. ३ ऑक्टोंबर २०१३ रोजी पंतप्रधानाच्या अध्यक्षाखालील मंत्रीमंडळाने स्वतंत्र तेलंगणा राज्याला संमती दिल्यानंतर[१२] लगेचच सीमांध्रात ७२ तासांचा कड-कडीत बंद घोषीत करण्यात आला ४ ऑक्टोंबर पासून पूर्ण सीमांध्रात काँग्रेस विरोधी रस्त्यावर येवून निदर्शने करण्यात आले [१३]या बंद मध्ये शासकिय गैरशासकीय सर्व संघटनानी सहभाग घेतला. तसेच शाळा महाविद्यालये, वाहातुक कामगार संघटना, तसेच वीज कर्मचाऱ्यांनीही भाग घेतला. अर्थात अखंड आंध्रासाठी सीमांध्रात आंदोलन सर्वव्यापक झाले सरकारने खबरदारी म्हणून केंद्रीय निमलष्करी (७५०) दल तैनात केले होते.[१४] वीज कर्मचाऱ्यांच्या सपांने (६ ऑक्टोंबर २०१३) पूर्ण आंध्रा अंधारात बुडाला, [(१५)] इकडे जगनमोहन रेड्डी ५ ऑक्टोंबर पासून उमरण उपोषणाला बसले. [१६] लगेचच तेदेपाच्या चंद्राबाबूंनीही, दिल्ली येथे आंध्रा भवनामध्ये अमरण उपोषण सुरु केले (७ ऑक्टोंबर २०१३).

दोघांच्याही उपोषणाचे मुळ कारण येणाऱ्या निवडणूकीत सीमांध्रातील लोकांची 'अखंड आध्रासाठीची' सहानूभुती मिळवून, सीमांध्रात राजकिय क्षेत्र प्राप्त करण्याची आहे. येथे एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे तेलंगणात, तेलंगणा राष्ट्र समितीचे आणि काँग्रेसचे वर्चस्व राहणार आहे. हे निश्चित झाल्यासारखे आहे. आता या दोघांनाही तेलंगणात स्थान मिळणार नाही हे नक्की झाले. असल्याने, सीमांध्रात येणाऱ्या निवडणूकीत सत्ता प्राप्त करण्याची स्पर्धा तेदेपा आणि YSRCP मध्येच होणार आहे तेथे काँग्रेस कमजोर होण्याच्या मार्गावर आहे. ही स्थिती लक्षात घेवून चंद्राबाबू यांनी 'अखंड आध्रांची' बाजू घेवून राजकारण सुरु केले आहे. त्यासाठी त्यांनी दिल्ली येथे ७ ऑक्टोंबर २०१३ रोजी आंध्रा भवनामध्ये अमरण उपोषण सुरु केले होते. उपोषणात ते म्हणाले येणाऱ्या निवडणूकीत तेलंगणा राष्ट्र समिती काँग्रेसमध्ये विलिन होणार आहे. आणि सीमांध्रात YSRCP च्या मदतीने काँग्रेस सत्तेत येण्यासाठी ही काँग्रेसची आगामी लोकसभेच्या निवडणूकांचे राजकारण आहे. आणि दोन्ही प्रदेशात तिला संगनमत करुन सत्तेत यायचे आहे.[१७] तेलंगणात TRS आणि सीमांध्रात YSRCP शी काँग्रेसने मॅचफिक्सिंग केली आहे. मी हे उघडकीस आणल्याशिवाय राहणार नाही. असे ही ते म्हणाले आणि त्यांनी उपोषण चालुच ठेवले. चंद्राबाबु ने आंध्राभवनात परवानगी न घेता उपोषण सुरु केल्याने त्यांना आंध्रासरकारनेच नोटीस दिली. तब्येत खालावल्याने त्यांना ११ ऑक्टोंबर २०१३ रोजी राम मनोहर लोहिया हॉस्पीटलमध्ये जबरदस्तीने हलविण्यात आले. सीमांध्रात ११ ते १२ ऑक्टोंबर 'फायलिन' चक्रावादळ आल्याने हे सर्व वातावरण शांत झाले. [१८]

तेदेपाला पोटनिवडणूकीत आलेले अपयश तेलंगणातील राजकीय क्षेत्र TRS ने हिरावून घेतले , सीमांध्रातील राजकीय क्षेत्र YSRCP ने हिरावून घेतल्याने TDP ची अवस्था घरका ना घाटका झाली आहे. अशा परिस्थिती TDP ने आपले राजकीय क्षेत्र संपेल की काय अशी भीती निर्माण झाल्याने घोंगावलेल्या TDP ने सीमांध्रात राजकीय क्षेत्राची सोय व्हावी म्हणून काँग्रेस आणि YSRCP च्या विरोधात भुमिका घेतली आहे. अर्थात ही तिच्या राजकिय आस्तित्वाची लढाई आहे.

**संदर्भ सूची :-**

१. सुहास पळशीकर, १० ते २८ फेब्रुवारी २०१३, आंध्रा तात्कालिक वर्चस्व आणि तीव्र स्पर्धात्मकतचे राजकारण, परिवर्तनाचे वाटसरु , पृष्ठ ३२, ३३
२. पुर्वोक्त
३. पुर्वोक्त.
४. पुर्वोक्त.

५. महेश शिरापुरकर, एप्रिल - जुन २००४ आंध्रप्रदेश निवडणूका: चंद्राबाबूंचा पराभव, समाज प्रबोधन पत्रिका अंक, १६७, पृष्ठ १०३, १०४, १०५
६. ''Centre agrees to from Telangana state''. Business Standeard १० December २००९. http://www.business-standard.com/india/news/centre-agrees-to-form-telangna-state/३७९१४२/.१० December २००९.
७. http://www.deccanchronicle. com/hyderabad-news/million-march-intensifies-in-hyderabad-statues-on-tank-bund-damaged-३२८३#tabs.
८. Desecration of statues in AP sparks controversy.
९. Crisis looms as ८१ Telangana MLAs, some MPs submit resignations.
१०. ''Hyderabad simmers as Congress puts off Telangana Call''. Times of India. ३१ January२०१३
११. ''Telangana Million March banned by government will take place, vow activists''. २७ September २०१२
१२. महाराष्ट्र टाईम्स, ४ ऑक्टोंबर २०१३, पी.टी.आय. नवी दिल्ली, पृष्ठ ०१
१३. श्रीनिवासन जनयला, ५ ऑक्टोंबर २०१३, एक्सप्रेस वृत्त सेवा लोकसत्ता, हैद्राबाद पृष्ठ ९
१४. वृतसंस्था,विशाखापट्टणम / हैद्राबाद, महाराष्ट्र टाईम्स, ७ ऑक्टोंबर २०१३.
१५. पुर्वोक्त.
१६. श्रीनिवासन जनयला, ५ ऑक्टोंबर २०१३, एक्सप्रेस वृत्त सेवा लोकसत्ता, हैद्राबाद पृष्ठ ९
१७. वृत्तसंस्था नवी दिल्ली, ८ ऑक्टोंबर २०१३ महाराष्ट्र टाईम्स पृष्ठ १०
१८. पी.टी.आय टाईम्स / नव्वी दिल्ली, लोकसत्ता १२ ऑक्टोंबर २०१३. पृष्ठ ९

RESEARCH JOURNEY